# पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी

## कार्यक्षेत्र आणि स्वरूप

संगीत-नृत्य-नाट्य-चित्रपट-लोककला-चित्र-शिल्प-छायाचित्र-साहित्य अशा विविध कलाप्रकारांशी निगडित अशी ही संस्था असेल.
महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील कला परंपरांचा आधुनिक अंगाने अभ्यास करणे,त्यांचे जतन करणे, वर्तमानाशी त्यांचे नाते जोडणा-या नवनवीन प्रयोगांना उत्तेजन देणे, उपकेंद्रे निर्माण करून या कलाप्रकाराचे आदानप्रदान करणे, भारतातील इतर प्रांतातील अशा उपक्रमांशी नाते जोडणे आणि आपली स्वतःची स्वतंत्र ओळख जाणीवपूर्वक जपत, आंतराष्ट्रीय पातळीवर या कलाप्रकारात निर्माण होत असलेल्या नवनवीन प्रेरणांची अभ्यासपूर्ण देवाणघेवाण करणे ही प्रमुख उद्दिष्टं असावीत.

१. संगीत

अ. शास्त्रीय गायन ......अ) हिंदुस्थानी ब) कर्नाटकी
ब. ” वादन अ) हिंदुस्थानी ब) कर्नाटकी
क. वाद्यवृंद
ड. उप-शास्त्रीय/नाट्य-संगीत/ सुगम-संगीत
इ. western classical
फ. संयोगी (Fusion)।
ग. चित्रपट-संगीत आणि इतर संगीत-प्रकार

१) गुरुशिष्य परंपरेप्रमाणे, नामवंत गुरूंकडून शिबिरं करणे.या शिबिरात झालेल्या ज्ञानसाधनेचे अंतिम रूप video-audio च्या माध्यमात जपणे.
२) लहान वयोगटात गायन वादनाची शिबिरं करून योग्य वयात उत्तेजन देणे.
३) शाळातल्या शिक्षकांसाठी अभ्यासकांकडून /जाणकारांकडून संगीत शिबिरं करणं.
४) आंतर्राष्ट्रीय आणि भारतीय पातळीवरचे महोत्सव
५) आंतराष्ट्रीय/ भारतीय पातळीवर विचारमंथन आणि या विचारमंथनातून निर्माण होणा-या अनुमानांना रसिकांपर्यंत पोहोचवणे.
६) शाळांत शिकवण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी संबधित संस्थांना अभ्यासकांद्वारे/तज्ज्ञांद्वारे मदत करणं.
७) university साठी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी संबधित संस्थांना अभ्यासक आणि तज्ज्ञ यांच्या सहाय्याने मदत करणे.
८) जतनकार्य. जुन्या जाणत्या कलाकारांची कला जपणे.video- audio या विषयांवरील ग्रंथ,हस्तलिखिते,छायाचित्रे, पत्रव्यवहार, cds,dvds,records,tapes, films,videos जपणे.

—— १)

९) निर्मिती आणि प्रयोग

२. शास्त्रीय नृत्य...अ) कत्थक ब) भरत नाट्यम क)मणीपुरी ड) ओडीसी ई)मोहिनी अत्तम संयोगी/ बॅले

१) गुरुशिष्य परंपरेप्रमाणे, नामवंत गुरूंकडून शिबिरं करणे.या शिबिरात झालेल्या ज्ञानसाधनेचे अंतिम रूप video-audio च्या माध्यमात जपणे.
२) लहान वयोगटांत गायन वादनाची शिबिरं करून योग्य वयात उत्तेजन देणे.
३) शाळातल्या शिक्षकांसाठी अभ्यासकांकडून /जाणकारांकडून नृत्य शिबिरं करणं.
४) आंतर्राष्ट्रीय आणि भारतीय पातळीवरचे महोत्सव
५) आंतराष्ट्रीय/ भारतीय पातळीवर विचारमंथन आणि या विचारमंथनातून निर्माण होणा-या अनुमानांना रसिकांपर्यंत पोहोचवणे.
६) शाळांत शिकवण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी संबधित संस्थांना अभ्यासकांद्वारे/तज्ञांद्वारे मदत करणं.
७) university साठी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी संबधित संस्थांना अभ्यासक आणि तज्ञ यांच्या सहाय्याने मदत करणे.
८) जतनकार्य. जुन्या जाणत्या कलाकारांची कला जपणे.video-audioया विषयांवरील ग्रंथ, हस्तलिखिते, छायाचित्रे, पत्रव्यवहार, cds,dvds,records,tapes, films,videos जपणे.
९) निर्मिती आणि प्रयोग

३. नाटक

अ) मराठी ब) हिंदी क) इंग्रजी ड) अन्य भाषा
गद्य-संगीत नाटक
प्रायोगिक नाटक
बाल नाट्य
पपेट-थिएटर आणि इतर forms

१) मराठी-हिंदी-इतर भाषिक प्रायोगिक नाटकांच्या प्रयोगांना उत्तेजन
२) नाटकाच्या वेगवेगळ्या अंगांविषयी शिबिरं.–अभिनय, संहिता, नेपथ्यइ .workshops
३) आंतर्राष्ट्रीय आणि भारतीय पातळीवरचे नाट्य-महोत्सव.
४) बालनाट्यासाठी खास शिबिरं.
५) शिक्षकांसाठी प्रशिक्षण-वर्ग
६) शाळा-university साठी अभ्यासक्रम तयार करण्यासाठी संबधित सस्थांना मदत करणे.
७) जतनकार्य.
८) script-bank
९) प्रायोगिक नाट्य निर्मिती आणि प्रयोग

४. लोककला

१) लोककलातील वेगवेगळ्या परंपरा जपणं -वेगवेगळ्या गावी शिबिरं कलावंताच्या सोईनुसार गायन,नृत्य,लोकनाट्य,भारूड,गोंधळ,आदिवासी नृत्य इ.परंपराचा अभ्यास वेगवेगळ्या परंपरांची गुरु-शिष्य नाती आणि शिक्षण.
२) नवे प्रयोग

३) जतन video/dvd इ. स्वरूपात
४) लोककला-महोत्सव
५) इतर प्रांतातील आणि वेगवेगळ्या देशातील लोककला यांचा आपल्याशी परस्पर-संबंध
६) पारंपारिक लोक-साहित्याचे जतन scripts भारुडं,गौळणी,वगनाट्यं इ.
७) निर्मिती आणि प्रयोग

५. चित्रपट अ) मराठी ब) हिंदी क)परदेशी

१) चित्रपट रसग्रहणाचे वर्ग.
२) चित्रपटांचे तांत्रिक अंगांशी सबंधित शिबिरे.workshops
२) आंतर्राष्ट्रीय आणि भारतीय चित्रपट-महोत्सव.
३) जतन- classic चित्रपटांच्या dvd आणि पुस्तकांचे ग्रंथालय

६. साहित्य मराठी आणि इतर भाषा अ) कथा ब) कादबरी क) कविता ड) ललित लेखन ई) वैचारिक लेखन या साहित्य-निर्मितीची प्रेरणास्थाने आणि प्रक्रियांबाबत विचारमंथन

१) लेखकांच्या भेटी -कलावंताशी विचारांची देवाणघेवाण
२) साहित्य आणि इतर कला परस्पर सम्बम्ध transcreations
३) उत्तम लायब्ररी- कला-साहित्य विषयक पुस्तकं,dvd,video

७. शिल्प-चित्र-फोटोग्राफी

गॅलरी / प्रदर्शनं
शिबीरं- या कलाप्रकारांविषयी कलावंत आणि जाणकार यांच्याशी होतकरूंची चर्चा आणि गुरू-शिष्य परंपरेतून शिबिरं. workshops
performing arts & visual arts trascreations

८. बहुमाध्यमातली देवाणघेवाण

९. महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात उप-केंद्रे उभी करणे. मुख्य केंद्र आणि इतर उप-केंद्रात आपसात उपक्रमांची देवाणघेवाण करणे.

१०. इतर प्रांतातील अकादमी आणि कला-केंद्रे याच्याशी उपक्रमांची देवाणघेवाण.

११.आंतराष्ट्रीय पातळीवरील संस्था आणि कलाकेंद्रांशी उपक्रमांची देवाणघेवाण.

## संकल्पना

### गुरु-शिष्य परंपरा

या अकादमीत गुरु-शिष्य परंपरा पद्धती जपादी शिवाय पंधरा वीस दिवसांच्या workshop साठी वेगळी

व्यवस्था असावी. मुंबईपासून थोडादूर. किंवा महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात
गुरुसाठी छोटंसं कॉटेज/शिष्यांसाठी रूम्स/किचन/तालमींसाठी हॉल बाहेर बाग/ झाडं इ.

### त्रैमासिक

अकादमीच्या सर्व activities चा आढावा घेणारे त्रैमासिक असावे.त्याशिवाय या सर्व कलाप्रकारांविषयी वेगवेगळी लेखांची मालिका असावी.

### जतनकार्य

कलावंताचे, नाटकांचे,साहित्यकारांचे, कलाप्रकारांचे video करून जतन करणे.त्याचप्रमाणे Audio सुद्धा. जुनी नाटकं,posters, जाहिराती, छायाचित्रं,कागदपत्रं,ग्रामोफोन रेकॉर्ड्स,cds,vcds,dvds,magnetic tapes,जुन्या नाटकाच्या sets,costumes,designs.जुन्या चित्रपटांच्या पटकथा.

### monograms

उत्तम कलावंतांची आयुष्यं,कलाप्रकारांचे मूल्यमापन, अभ्यासपूर्ण लेखांचे संकलन पुस्तकरूपाने करावेत.

### script-bank

नाटककारांचे शिबीर आणि त्यातून scripts लिहून घेणे आणि जतन करणे.

### Film-society/ membership

स्वतःची film-society आणि membership तयार करणे.परदेशातील arts-centres संकल्पनेप्रमाणे सगळ्या कार्यक्रमांसाठी वर्षासाठी membership चा विचार करावा.

### निर्मिती आणि प्रयोग

प्रायोगिक मूल्यांवर भर देणारी निर्मिती करावी आणि तिचे विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रयोग करावेत.

### महोत्सव

नाट्यप्रयोग महाराष्ट्रातले आणि बाहेरचे आणि त्यांचे festivals/dance-festivals/ film festivals/ music-festivals--लोककला महोत्सव—— आंतर्राष्ट्रीय आणि भारतीय पातळीवरचे..

**या उपक्रमांची दिशा निश्चित करून टप्पे ठरवून कार्य करावे.(phases)**

**या विविध मुद्द्यांवर सर्वंकष चर्चा व्हावी, कालबाह्य मुद्दे गाळले जावेत आणि नवीन अंगाने विचार मांडले जावून मौलिक भर पडावी ही अपेक्षा आहे.**

# योजना

या वर्षी खालील योजना राबवण्याचा विचार व्हावा.

**शास्त्रीय संगीत**

**स्थळ- मुंबई**

१) गुरू-शिष्य परंपरेतील शिबिर

अ) शास्त्रीय गायन
ब) शास्त्रीय वादन

हे शिबिर गुरूच्या सोयीनुसार व्हावे.१ ते ३ महिन्याचा काळ ठरवावा.
शिष्यांसाठी जाहिरात देऊन महाराष्ट्र आणि बृहन महाराष्ट्रातून अर्ज मागवावेत.त्यांची योग्य छाननी करून शिबिर भरवावे.

शिबिराच्या वेगवेगळ्या सत्रांचे चित्रीकरण आणि ध्वनीलेखन व्हावे.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी शिष्यांची मैफल व्हावी.

२) दर तीन महिन्याला एका रागाचे सपूर्ण दर्शन व्हावे.

अ) दोन दिवसांच्या कार्यक्रमात चर्चासत्र असावे.ते सर्वांसाठी खुले असावे.
ब)रागदर्शन- शिबिरार्थींसाठी मुख्यतः-प्रेक्षकांसाठी मर्यादित प्रवेश.
क) रविंद्र मंचावर १) जाणते जुने गायक त्या रागाचे दर्शन घडवतील
२) नवोदित गायक गातील
ड) यानिमित्ताने त्या रागासंबंधित पुस्तक निघेल.
ई) या सत्राचे चित्रीकरण व्हावे.

३) एका वर्षी एका घराण्याचे ''दर्शन''.

अ) चर्चासत्र-जाणकारांचे आणि जुन्या नव्या गायकांचे.सर्वांसाठी खुले.
ब) रविंद्र मंचावर जुन्या नव्या कलाकारांचा आविष्कार.
क) चित्रीकरण.
ड) पुस्तक.

४) अखिल भारतीय संगीत महोत्सव.

५) ध्वनि किंवा ध्वनि चित्रफीती.जतन

६) महानगरपालिकांच्या शाळांमधल्या मुलामुलींना शास्त्रीय संगीतातले(गायन-वादन)प्राथमिक धडे. ३०-३५ ची संख्या, नंतर उत्तम असतील त्यांना पुढील शिक्षण.

## मुंबईबाहेर..

वरील कांही उपक्रम महाराष्ट्रात, जिथं NGO s काम करीत आहेत,त्यांच्या मदतीने किंवा शासकीय पातळीवरसुद्धा राबवले जावेत.
मुंबईबाहेर अखिल महाराष्ट्र,दिल्ली आणि गोवा आणि बृहन्महाराष्ट्र गृहित धरलेला आहे.
विशेषतः गुरू-शिष्य परंपरा जास्त परिणामकारक ठरेल.
जिल्हा-परिषदेतील विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीतातले धडे. (गायन-वादन)

**शास्त्रीय नृत्य**

वरीलप्रमाणे.
१) एखाद्या शाखेवर वर्षभर कार्य.

**नाटक**

वरीलप्रमाणे मुंबई आणि महाराष्ट्रात इतर ठिकाणी.

१) नाट्यलेखन शिबिरं महाराष्ट्र-पातळीवर. उत्तम नाटककार निर्माण व्हावेत हा प्रयत्न.
२) आंतराष्ट्रीय, भारतीय आणि महाराष्ट्राच्या पातळीवरच्या नट,दिग्दर्शक आणि इतर रंगकर्मींशी चर्चासत्रे आणि शिबिरं.
३) ''संगीत नाटका''चे पुनरुज्जीवन. गायक नटांचे training गायन -अभिनय या अंगाने.प्रयोग.
४) उत्तम नाटकांचे चित्रीकरण. उपलब्ध असेल तर जतन.
५) नाट्यमहोत्सव.international,national and Marathi.
६) इतिहासाचे जतन.data नाट्यकर्मींचे.
७) thematic exibitions.

८) श्रीराम लागू विजय तेंडुलकर यांच्याबरोबर चर्चा-सत्रं.
९) मान्यवरांचे जन्मदिवस कार्यशाळा
१०)नेपथ्य- दिग्दर्शन- वेशभूषा- रंगभूषा- अभिनय शिबिरं

लोककला

१) जतनकार्य.परंपरा जपण्यासाठी.data
२)एखाद्या विशिष्ट परंपरेवर चर्चासत्र,प्रयोग,चित्रीकरण. round table.
या वर्षी लावणी आणि भारूड हे विषय.
३) नामवंत कलाकाराबरोबर चर्चासत्र.चित्रीकरण.
४) लोककला महोत्सव

बाकी कला शाखा याच पद्धतीने कार्य करतील.

छायाचित्र

१) एक उत्तम स्टुडियो, उत्तम उपकरणं.

२) होतकरूंसाठी शिक्षण

३) ज्यांना basic माहिती आहे त्यांच्यासाठी पुढील शिक्षण.

४) digital उपकरणं. design.printingची सोय अकादमीसाठी आणि बाहेरील कामासाठी revenue मिळेल.

साहित्य

१) meet the Auther.

२) सौंदर्यशास्त्र आणि कलासमीक्षा कार्यशाळा

३) performing arts and the literature कार्यशाळा

४)कथा कथन आणि अभिनय- नाट्यरूपांतर

५)कविता आणि अभिनय नाट्य रूपांतर

६) पुस्तक प्रकाशन आणि लेखक

७) साहित्यिकांचे जन्मदिवस- कार्यशाळा

८) साहित्य प्रकारातले milestones-चर्चा

**चित्रपट**

१) कला अकादमीची film society
२) तंत्र शिबिरं- चित्रण दिग्दर्शन ध्वनी संकलन अभिनय आस्वाद पटकथा
३) आंतराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव
४) उत्तम चित्रपट संग्रह-- दाखवण्याची सोय study circle
५)दिग्दर्शक नट संगीत दिग्दर्शक गायक तंत्रज्ञ -जन्म दिवस कार्यशाळा आणि celebration